# जागतिकीकरण आणि मराठी कांदबरी

**डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे,** कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज

Email-sharmilagmore@gmail.com भ्रमणध्वनी : ९५५२५३३६४०

---

**सारांश**:साधारणपणे १९८० च्या दशकामध्ये जगभरात जागतिकीकरणाचे वादळ उठले. भारताने १९९१ मध्ये डंकेल प्रस्तावावर सही केली. आणि त्यानंतर भारतात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले आणि त्याला खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले. The world has become a global village. GATT General Agreement on trade and Trade and Tariff जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेसंबंधी असणारा हा करार भारताने स्वीकारला.१९९० नंतरच्या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक समाज जीवनावरती याचा गंभीर परिणाम झाला.

**प्रस्तावना**.जागतिकीकरण ही संकल्पना खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारतात आर्थिक आणि भौतिक विकास झपाट्याने सुरू झाला. जागतिकीकरणाचा भारताच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय विचारसरणीवर प्रभाव पडू लागला. या खुल्या आर्थिक धोरणामुळे ग्रामीण भागातील लहान मोठ्या उद्योग व्यवसायांच्या अस्तित्वाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. देशातील नवनवीन तंत्रज्ञान खेड्यापर्यंत पोहोचले. त्यामुळे बेकारीची समस्या फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली. विशेषतः गाव -खेड यांची स्वतंत्र अर्थव्यवस्था मोडीत निघाली. तरुण आणि शेतकरी यांच्या जीवनावर गंभीर आर्थिक परिणाम झाला.ज्या समाजात लेखक राहत असतो त्याप्रमाणेच लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व तयार होत असते. साहित्य व समाज यांचा परस्पर संबंध असतो.जागतिकीकरणाचा मानवी जीवनावर बरे वाईट परिणाम होत असतात. आणि तेच बदल लेखक आपल्या साहित्यकृतीतून बदलत्या समाज जीवनाचे वास्तव जीवन चित्र रेखाटत असतो.जागतिकीकरणाचे परिणाम मराठी साहित्यावर सन 1990 नंतर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो 1990 नंतरच्या ग्रामीण कादंबरीमध्ये मराठी कादंबरीमध्ये वास्तवाचे विविध प्रकारे चित्रण येऊ लागले.जागतिकीकरण हीसंकल्पना खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारतात आर्थिक आणि भौतिक विकास झपाट्याने सुरू झाला. जागतिकीकरणाचा भारताच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय विचारसरणीवर प्रभाव पडू लागला. या खुल्या आर्थिक धोरणामुळे ग्रामीण भागातील लहान मोठ्या उद्योग व्यवसायांच्या अस्तित्वाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. देशातील नवनवीन तंत्रज्ञान खेड्यापर्यंत पोहोचले. त्यामुळे बेकारीची समस्या फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे**:समाजामध्ये समानता येण्याऐवजी विषमताच मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली जागतिकीकरणामुळे माणसाची जागा यंत्राने घेतली. त्यामुळे माणुसकीचा ऱ्हास झाला. कारण मुक्त अर्थव्यवस्था, चळवळ, दहशतवाद, शिक्षणाचे व्यापारीकरण, राजकारणामधील गुन्हेगारी, सरकार व जनता सामाजिक धार्मिक सरोदेचा खेड्यातील जनतेवर परिणाम जागतिकीकरणाचे दुष्परिणाम बदलत्या जीवनाचे अस्वस्थ वर्तमान खेड्यातील माणसाचे तुटले, पण भारतीय पारंपारिक जीवनाची मोडतोड, माणसाच्या व्यवहारिक जीवन , तेथील कोरडेपणा,हिंस्रता, जीवनातील नवे प्रश्न आव्हाने, प्रेरणा त्यामधूनच मराठी कादंबरीची पण निर्मिती झाली. बदलत्या ग्रामीण वास्तवाचा वेध , दुष्काळाची मानवी जीवनावरील परिणाम, धरणग्रस्तांचे प्रश्न, भटक्या विमुक्तांचे प्रश्न, सहकार चळवळ, सहकारी साखर कारखाना, भ्रष्ट राजकारण, नागरिकीकरणाचे विविध प्रश्न, विवाह संस्था बदलते स्वरूप, विभक्त कुटुंब पद्धत इत्यादी अनेक विषय 1990 च्या कादंबरीमध्ये दिसून येतात. याचा सर्वकष शोध घेणे.या या शोधनिबंधातूनही ही उद्दिष्टे अभिप्रेत आहेत.

**संशोधनासाठी वापरलेल्या पद्धती**: प्रस्तुत संशोधन निबंधाचा आवाका लक्षात घेऊन मोजक्या संशोधन पद्धतींचा वापर केलेला आहे. त्यामध्ये वर्णनात्मक, निरीक्षणात्मक, समाजशास्त्रीय इत्यादी संशोधन पद्धतींचा योग्य वापर केलेला आहे.

बीजसंज्ञा : जागतिकीकरण, खाजगीकरण,उदारीकरण

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की कोणत्याही गोष्टींचा विचार जागतिक दृष्टिकोनातूनच करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिक पातळीवर होत असलेले राजकीय आर्थिक व सांस्कृतिक एकीकरण म्हणजे जागतिकीकरण.जागतिकीकरण म्हणजे काय गॅट करारावर सही करून भारताने शेती व्यापार गुंतवणूक सेवा योजना इत्यादी क्षेत्रातील निर्णय नियमनांचा हक्क गमावला आहे. ग्रामीण अल्पभूधारक शेतकरी यांना मिळणाऱ्या विविध सवलती सबसिडी बंद झाल्या. महागडी युरिया खते बियाणे खरेदी करून नव्या तंत्राचा खर्च सोसून उत्पादन काढणे नेसले कंपनी सारखा सारख्यांच्या दुधाची स्पर्धा करणे भावना मिळाल्यास कर्जाच्या दबावने हातबल होणे. त्यांच्या नशिबाने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला.१ प्रगत राष्ट्रांचे हे व्यापारी दुप्पिपी धोरण स्वार्थी आहे. यामुळे येथील मूळ कृषिजन संस्कृतीवर आघात होत आहेत. ती

रसातळाला जात आहे. हे हळूहळू येथील लेखक विचारवंतांना लक्षात येऊ लागले. त्याची मांडणी साहित्यिकांनी आपल्या लेखनाद्वारे केली आहे.2 जागतिकीकरण आणि 1990 नंतरचे सामान्यांचे बदलते जीवन 1990 नंतर भारतीय जलसामानांचे भौतिक जीवनमान उंचावलेले दिसते. टीव्ही आंतरजाल मॉल कॉम्प्युटर, भ्रमणध्वनी,डाटा, रेंज, रिचार्ज,माऊस, स्क्रीन पेज, पेन, ड्राईव्ह, प्रिंट, इमेज, हॉटस्पॉट, डॉट, कॉम, रिप्लाय या वस्तूंचा आणि शब्दांचा अतिशय सराईतपणे होत जाणारा स्वीकार दळणवळणाच्या अतिविकसित सोयी खाद्यपदार्थ विदेशी पेय पोशाख या सर्व स्तरातील हस्तक्षेपामुळे सामान्य माणसाची जगण्याची उद्दिष्टे बदलू लागलेली दिसतात.3 जागतिकीकरण आणि 1990 नंतरचे मराठी साहित्य जागतिकीकरणाच्या आणि आर्थिक उदारीकरणाचे या काळात व्यक्तीचा भुगा होतो आहे. माध्यमांनी व्यक्ती व्यक्ती मधला भेद कमी करून अस्मितेची उभारणी अशक्य केल्या या विविध तणावाखाली व्यक्तीची कसे विघटन घडते आहे. याचे चित्रण मराठी कादंबरी करू लागली. विघटनाच्या या प्रक्रियेमध्ये व्यक्तीच्या आयुष्या अस्तित्व जसे धोक्यात येत आहे. तसेच समाज सदस्यांना परस्पर ही जोडणाऱ्या अर्थपूर्ण आयुष्य शक्य करणाऱ्या समाजाची संकल्पना धोक्यात येऊ लागली आहे. तसेच समाज सदस्यांना परस्परांशी जोडणाऱ्या अर्थपूर्ण आयुष्य शक्य करणाऱ्या समाजाची संकल्पना ही समर्थ नासाडी व अर्थ शून्याचा स्पष्ट करून पाहणाऱ्या कादंबऱ्या श्याम मनोहर रंगनाथ पठारे, अनिल धामणे,मकरंद साठे.जी के ऐनापुरे यासारख्या लेखकांनी अलीकडच्या काळामध्ये कांदबऱ्या लिहिलेल्या दिसून येतात 1990 नंतर जे भौतिक बदल झाले त्याचे फार मोठे परिणाम गाव खेडे नागरी जीवनावर झालेले पाहायला मिळतात.‘अस्वस्थ नायक’ ही उत्तम कांबळे यांची १८४ पृष्ठांची कादंबरी. तिच्या नावाप्रमाणे संवेदनशील आणि सुजाण वाचकांना नक्कीच अस्वस्थ करून सोडते. अस्वस्थ होत चाललेल्या जगातील अस्वस्थ नायकाची ही कथा आहे. या कादंबरीत बेकारीचे चित्र आले आहे. सुशिक्षित बेकार जीवन जगत असताना अनेकांनी जगण्यासाठी चालवलेल्या लढाईची व त्यांच्या मनातील अस्वस्थता यांची ही कहाणी आहे. या कथेचा नायक प्रशांत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी कितीही अस्वस्थता आले तरी धडपडताना दिसतो. असे असले तरी तो बेकारीचा चक्रव्यूह तोडण्यात यशस्वी होत नाही. हीच मोठी शोकांतिका आहे. प्रवीण बांदेकर यांची ‘चाळेगत’ या कादंबरीमध्ये वर्तमान राजकारणाचे वास्तव चित्रण आले असून त्यांनी ग्रामीण समाज जीवनावरील जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे राजकारणातील नैतिक मूल्यांची घसरण कशा पद्धतीने होते याचे चित्रण केले आहे. महेंद्र कदम यांच्या आगळया कादंबरीत मधून कौटुंबिक व्यवस्थेचे स्वरूप अभिव्यक्त झाले असून कौटुंबिक व्यवस्थेचे संयुक्त आणि विभक्त कुटुंब पद्धतीचे विवेचन केले आहे. शंकर सखाराम यांच्या एसईझेड या कादंबरी मधून कौटुंबिक व कृषीनिष्ठ मूल्यांचा कसा ऱ्हास झाला आहे. याचे विवेचन आले आहे. जागतिकीकरण ही संकल्पना व्यापक असून त्याचा ग्रामीण अर्थव्यवस्था पारंपारिक मूल्य कृषी व्यवस्था अशा विविध क्षेत्रावर प्रभाव पडलेला दिसून येतो . ग्रामीण समाज जीवनाची जीवनशैली शिक्षण कृषीनिष्ठ संस्कृती राहणीमान या सर्व घटकात जागतिकीकरणामुळे परिणाम झालेला दिसून येतो. कृष्णात खोत ‘रौंदाळा’ राजन गवस ब – बळीचा, सदानंद देशमुख ‘तहान’ महेंद्र कदम ‘धुळपावलं’ या कादंबरी मधून समाजकारण अर्थकारण आणि शिक्षण या क्षेत्रातील नैतिक मूल्यांचे अवमूल्यन, पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रियांचे बदलते स्वरूप या कादंबरी मधून चित्रित झाले आहे.कापूस काळ ही कैलास दौंड यांची कादंबरी. या कांदबरीमध्ये कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची संघर्षकता आहे. पिकाला योग्य हमीभाव मिळत नाही. यासाठी शेतकऱ्यांनी केलेली धडपड या कादंबरीमध्ये पाहायला मिळते. कापूस हे एकच पीक केंद्रस्थानी ठेवून ते पिकवणाऱ्या शेतकऱ्याचे प्रश्न तीव्रतेने मांडणाऱ्या ही कादंबरी आहे. रवींद्र शोभणे यांची पांढर (२००९) ही कादंबरी ग्रामीण आशय व्यक्त करणारी आहे. या कादंबरीत दुष्काळाच्या भीषणतेमुळे कोलमडून पडलेल्या खेड्याचे वास्तव दर्शन घडविले आहे. सामाजिक राजकीय धार्मिक व शैक्षणिक पातळीवर निर्माण झालेले ज्वलंत प्रश्न तसेच जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरण या यांच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या भेसळ भेसळ बेसुर प्रश्नांमुळे ग्रामीण भाग कसा होरपळतो आहे याचे वास्तव चित्र या कादंबरीमध्ये आले आहे. महेंद्र कदम म्हणतात, स्वीकारातून काही चांगले शोधू पाहत असताना जागतिकीकरणाने मानवी जीवनात अमूलात बदल घडवून आणला. आणि अत्यंत वेगाने मानवाचे वस्तुत रूपांतर होऊ लागले.भय ग्रस्तता, संभ्रमित अवस्था,सा शं कता या सगळ्याबरोबर आपण वस्तू बनत चाललो आहोत याचे भान 2000 नंतरच्या कादंबरीने व्यक्त केले आहे नामुष्कीचेस बघत बळीचा चाळेकर या कादंबऱ्यांनी हे भान व्यक्त केले आहे3 जागतिकीकरणामुळे माणूस हा माणसापासूनच दूर निघालेला आहे मानवी जीवनात शासनकता संभ्रम आणि भयाची वातावरण निर्माण झाले आहे जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे सामान्य माणसाचे जीवन नामशकीचे झाले आहे नामुष्कीचे नामुष्कीचे म्हणून महेंद्र कदम बनतात ही रंगनाथ पठार यांच्या एकूण कादंबऱ्यांमधील एक महत्त्वाची कादंबरी सामाजिक सांस्कृतिक आर्थिक राजकीय आणि वैश्विक पातळीवर माणसाच्या जगण्याची ससेहोलपट किती भीषण उपधारण करीत आहे याचे चित्र ही कादंबरी करते जागतिकीकरण नावाच्या

गोष्टीने किती विक्राळ रूप स्वरूप धारण केले आहे आणि त्यात सामान्यना जगणे कसे नामसकीचे बनले आहे याचे चित्र या कादंबरीमध्ये येते.४ नामुष्कीचे स्वगत ही रंगनाथ पठारे यांची कादंबरी 1999 मध्ये प्रसिद्ध झाली जागतिकीकरणाचा मानवी जीवनावरील परिणाम दर्शवणारी ही एक महत्त्वाची कादंबरी आहे पखाल ही बाबाराव मुसळे यांची कादंबरी असून या कादंबरीमध्ये गावात आलेल्या सुधारणांमुळे कोणी समाजापुढे उभ्या राहिलेल्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नांचे दर्शन घडते सदानंद देशमुख यांची बारोमास ही कादंबरी २००२ मध्ये प्रसिद्ध झाली. या कादंबरीमध्ये विदर्भातील शेतकरी कुटुंबाच्या तीन पिढ्यांचे चित्रण कादंबरीमध्ये येते. या कादंबरीमध्ये लहरी व नुकसानीचा पाऊस, शासकीय कचऱ्यातील होणारा भ्रष्टाचार, बेरोजगारांची समस्या, शोषण, खेड्यांवर शहरी संस्कृतीचे होणारे आक्रमण इत्यादी विषयाचे वास्तव चित्र या कादंबरीमध्ये येते. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांची होणारे हाल त्यांचे विविध प्रश्न त्यांच्या व्यथा, वेदना, त्यांच्या समस्या यांचे सूक्ष्मरित्या चित्रण केलेले आहे. विश्वास पाटील यांची पांगिरा ही कादंबरी १९९० साली प्रकाशित झाले असून या कादंबरीमध्ये गावच्या पांढऱ्या मातेच्या तेथील राजकारणाच्या निसर्गाच्या व्यथा आणि कथा सांगणारी ही कादंबरी आह

**निष्कर्ष:**

1. जागतिकीकरणाचा विपरीत परिणाम १९९० नंतरच्या ग्रामीण कांदबरीमध्ये पहावयास मिळतो.
2. कृषीनिष्ठ समाज व्यवस्थेवर जागतिकीकरणाचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.
3. १९९० नंतरच्या कादंबरीतून समाजातील वास्तवता केवळ वर्णनात्मक रीतीने आलेले नसून ती मूल्ययुक्त कृतीतून केंद्रस्थानी असलेली दिसून येते.
4. ग्रामीण संस्कृतीवर शहरी संस्कृतीचा असलेला प्रभाव दिसून येतो .
5. १९९० नंतरच्या कादंबरीतील एकूणच वातावरण जागतिकीकरणाचे वास्तव आहे
6. १९९० नंतर जागतिकीकरणाने मूल्यांपेक्षा पैशाला प्राधान्य दिलेले दिसून येते
7. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये मध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय बदल जगभराच्या पटलावर झालेलेले आहेत. त्याचे प्रतिबिंब साहित्यातून उमटताना दिसतात.
8. भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम भारतावर अधिक झाला आहे.
9. प्रामुख्याने शेतकरी वर्गावर जागतिकीकरण आणि मानवी मूल्ये यातील संघर्ष हे साहित्य मांडते.
10. यांत्रिकीकरणामुळे शेतमजुरांवर बेरोजगारीची वेळ आली
11. कर्जास कंटाळून शेतकरी आत्महत्या करताना दिसतात

**समारोप** : १९९० नंतरच्या जागतिकीकरणाचा परिणाम जगभर झाला. या बदलत्या व्यक्तीचे चांगले वाईट परिणाम समाजातील सर्व स्तरांवर झाला.ग्रामीण माणसाची जीवनशैली शिक्षण कृषीनिष्ठ संस्कृती राहणीमान या सर्वच घटकात जागतिकीकरणाचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.१९९० नंतरच्या कादंबऱ्यांमधून ग्रामनिष्ठा शेती, स्त्री, शेतमजूर, पाश्चात्य संस्कृती मूल्य व्यवस्था याच्यावर जागतिकीकरणाचा झालेल्या परिणामाचे वास्तव चित्रण कादंबरीकार आणि केलेले दिसून येते जागतिकीकरणाचा सर्व क्षेत्रावर पडलेला प्रभाव त्यातून झालेली मूल्यांची पडझड, चंगळवाद , कौटुंबिक अस्वस्थता, शहरीकरण, कृषी व्यवस्थेतील बदल, हरवत चाललेली माणुसकी याचे वास्तव चित्र आलेले दिसून येते.

**संदर्भ**

1)पवार डीव्ही :ग्रामीण अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरण व उदारीकरणाचे परिणाम" भाग सात ऑक्टोबर नोव्हेंबर २०१८ पृ. ८७

2) थोरात हरिश्चंद्र :आजची मराठी कादंबरी नव्या वाटा (प्रज्ञादया पवार) संपादित परिवर्तनाचा वाटसरू, दीपावली विशेषांक २००९ पृ.१०८

3)कदम महेंद्र: प्रयोगशील मराठी कादंबरी, लेख ललित कादंबरी विशेषांक ( संपा) अशोक कोठावळे, दिवाळी नोव्हेंबर २०१३ पृ १०५ –१०६

४)तत्रैव :१०३

जागतिकीकरण हीसंकल्पना खऱ्या अर्थाने अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारतात आर्थिक आणि भौतिक विकास झपाट्याने सुरू झाला. जागतिकीकरणाचा भारताच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय विचारसरणीवर प्रभाव पडू लागला. या खुल्या आर्थिक धोरणामुळे ग्रामीण भागातील लहान मोठ्या उद्योग व्यवसायांच्या अस्तित्वाचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला. देशातील नवनवीन तंत्रज्ञान खेड्यापर्यंत पोहोचले. त्यामुळे बेकारीची समस्या फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली.